## F.Y.B.COM. SEM – II (CBCS - 2016 COURSE) : SUMMER - 2018
### SUBJECT: MARATHI-II

Day : **Wednesday**
Date : **25/04/2018**

**S-2018-0259**

Time : **03.00 PM TO 06.00 PM**
Max. Marks : 60.

---

**सूचना:**

१) सर्व प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहेत.
२) उजवीकडील अंक **गुणांचा निर्देश** करतात.
३) मराठी भाषेच्या लेखननियमांनुसार लेखन करणे आवश्यक आहे.

---

**प्र.१ अ)** पुढीलपैकी योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा. (०६)

१) न्यायालयीन कामकाजात इतिवृत्ते ही ----- म्हणून ग्राह्य धरली जातात.
(अ) द्वितीय पुरावा (ब) प्रथम पुरावा (क) माहिती (ड) सूचना

२) ----- लेखन म्हणजे घडलेल्या घटनेचा अर्थपूर्ण गोषवारा असतो.
(अ) अहवाल (ब) पत्र (क) निबंध (ड) वृत्त

३) ----- हे सर्वदूर पसरलेले आणि सर्वसामान्यांना परवडणारे असे प्रसामाध्यम आहे.
(अ) वृत्तपत्र (ब) दूरदर्शन (क) आकाशवाणी (ड) इंटरनेट

४) सभाध्यक्षांच्या आदेशानुसार ----- हा सभा सुरू होणार असल्याची उद्घोषणा करतो.
(अ) चिटणीस (ब) लेखनिक (क) सभासद (ड) कार्याध्यक्ष

५) ----- म्हणजे उत्पादक आणि ग्राहक यांना जोडणारे एक परिणामकारक माध्यम आहे.
(अ) वृत्तपत्र (ब) नियतकालिक (क) जाहिरात (ड) मथळा

६) ----- म्हणजे कार्यालयाने घेतलेल्या निर्णयाची किंवा कृतीची सार्वजनिक नोंद असते.
(अ) सूचनापत्रक (ब) परिपत्रक (क) माहितीपत्रक (ड) घोषणापत्रक

**ब)** पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (०६)

१) दोन व्यक्ती ऑनलाईन असताना एकमेकांशी लिहून गप्पा मारण्याच्या पद्धतीला काय म्हणतात?
२) जाहिरातीच्या प्रसारणाची दोन प्रमुख माध्यमे कोणती?
३) नभोवाणीवर कार्यक्रमाच्या सुरुवातीला व शेवटी त्या कार्यक्रमाविषयी माहिती दिली जाते, त्याला काय म्हणतात?
४) टिपण लिहिण्याच्या प्रकाराला कार्यालयात काय म्हणतात?
५) नियोजित वेळेला सभेचे कामकाज सुरू करण्यासाठी एकूण सभासद संख्येच्या किती सभासद संख्या वेळेवर उपस्थित असावी लागते?
६) कार्यालयातून पत्र जात असताना त्यावर पत्र पाठवणीचा क्रमांक टाकला जातो, त्याला काय म्हणतात?

**प्र.२** मानवी व्यवहारातील संज्ञापनाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा. (१२)

**किंवा**

संवाद साधताना कोणकोणते अडथळे येऊ शकतात.

P.T.O.

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा. (१२)

**क)** 'आकाशवाणी'चे सामर्थ्य सोदाहरण सांगा.

**ख)** विविध प्रकारचे अहवाल तयार करताना आवश्यक असणारे मुद्दे लिहा.

**ग)** 'जाहिरात ही एक उपयोजित कला आहे'- या विधानाचा परामर्श घ्या.

**प्र.४** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा. (१२)

**क)** तुमच्या महाविद्यालयात आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचा **वृत्तांत** लिहा.

**ख)** सुट्टीच्या कालावधीत महाविद्यालयीन विद्यार्थी वृद्धाश्रमांना भेटी देणार आहेत, त्या संदर्भात आयोजित केलेल्या बैठकीचे **इतिवृत्त** लिहा.

**ग)** टिप्पणीचे प्रकार कोणते,ते लिहा.

**प्र.५** पुढीलपैकी कोणत्याही **तीन** विषयांवर विवेचक टीपा लिहा. (१२)

**क)** माहितीपत्रकाचे स्वरूप

**ख)** प्रगत भाषिक कौशल्ये

**ग)** कार्यालयीन पत्रव्यवहाराचे महत्त्व

**घ)** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील यशस्वी विद्यार्थ्यांची मुलाखत

**च)** परिसरातील अस्वच्छतेसंबंधीचे तक्रारपत्र

* * *